# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.६२२/२०२३/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. भास्कर आनंदा कोळी,<br>रा. मु. पो. वराडसिम,<br>ता. भुसावळ, जि. जळगांव. | अध्यक्ष,<br>विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वराडसिम,<br>ता. भुसावळ, जि. जळगांव. | सहायक निबंधक,<br>अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव, पहिला माळा, नविन प्रशासकीय इमारत, टप्पा क्र.3, आकाशवाणी चौक, जळगांव, ता. जि. जळगांव. |

**सुनावणी दिनांक — ०९/०५/२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०३/०२/२०२३

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती नाकारली म्हणून.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १०/१०/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०/१०/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ------

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१. श्री. तेजेश्र्वर रामदास ढाके, यांचा संस्थेचा कारकुन म्हणुन नेमणुकीचा व आर्थिक व्यवहार प्रदान करणे बाबतचा ठराव.
२. ३०/०९/२०२२ रोजी पार पडलेल्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये सभासदांना वाचुन दाखविण्यात आलेल्या अहवालाची प्रत.
३. ३०/०९/२०२२ रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या संपुर्ण ठरावची प्रत.
४. सन २०१२-१३ ते २०२१-२०२२ या कालावधीत थकबाकीदार लोकांची सही व त्यांच्यावर केलेल्या कार्यवाहीची प्रत.
५. सन २०१२-१३ ते २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये उघडकीस आलेली बोगस प्रकरणे नावांची यादी.
६. सन २०१२-१३ ते २०२१-२२ या कालावधीमध्ये गैरव्यवहार केलेल्या कर्मचाऱ्यावर कायदेशीर कार्यवाहीची प्रत.
७. सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ ऑडीट रिपोर्ट.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ३०/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर अर्जात संस्था व सर्व सभासदाबाबतीत अनेक १ ते ७ मुद्यांची माहिती संस्था देऊ शकत नाही. तरी आपण माहितीच्या अधिकाराखाली संस्थेची माहिती मागितलेली आहे. सदर माहितीचा अधिकार संस्थेला लागु नाही.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १७/०१/२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३/०१/२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती नाकारली आहे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३/०१/२०२३ च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अर्जान्वये जन माहिती अधिकारी सचिव, वराडसिम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वराडसिम ता. भुसावळ जि. जळगांव यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकार अर्ज दाखल केलेला आहे. वराडसिम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वराडसिम ता. भुसावळ जि.जळगाव या संस्थेचे प्रथम अपिलीय अधिकारी सहायक निबंधक सहकारी संस्था, भुसावळ कार्यालय हे नसल्याने आपला संदर्भिय अर्ज निकाली काढण्यात येत आहे. असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविलेले आहे.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही असेही त्यांनी नमूद केले.

६. **निष्कर्ष —**

- अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वस्तुस्थिती कळविलेली आहे.
- तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था भुसावळ यांनी प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी न घेता वस्तुस्थिती कळविलेली आहे.
- सदर संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही. असे दिसून येते.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक ६२२/२०२३/जळगाव निकाली काढण्यात येत आहे

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९०३ 06 JAN 2025 06 JAN 2025

निर्गमित केले.
दिनांक 06 JAN 2025
सही